# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे फोन नंबर ०२२ - २९४५१००१

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट १३/२०२५ दि. ०९/०१/२०२५

## Fedex Courier च्या नावाने फसवणुक झालेल्या तक्रारदार यांना २,६९,४८६/-/- रूपये परत करण्यात सायबर पोलीस ठाण्यास यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील काशिमिरा पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार नामे श्री. राठोड यांना अनोळखी इसमाने फोन करुन **Fedex Courier** मधुन बोलत असल्याचे सांगितले. तक्रारदार यांचे नावाचे कुरीयर आले असुन त्यावर अपुर्ण पत्ता असल्याने योग्य पत्यासह ५/- रु चे ट्रान्झॅक्शन करण्यास तक्रारदार यांना सांगितले. तक्रारदार यांनी कुरीयरबाबत पडताळणी न करता संशयीत इसमाने सांगितल्याप्रमाणे कारवाई केली असता त्यांचे बँक खात्यातुन मोठी रक्कम कपात झाल्याबाबतचा मॅसेज त्यांचे मोबाईलवर प्राप्त झाला. त्यावर तक्रारदार यांची फसवणुक झाल्याचे लक्षात आले. तक्रारदार यांनी सदरबाबत सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज सादर केल्याने त्याबाबत नोंद घेवुन **NCCRP Portal** वर त्यांची तात्काळ नोंद घेण्यात आली.

**(सायबर पोलीस ठाणे अर्ज आवक क्र.२०७२/२०२४ अन्वये)**

तक्रारदार यांची ऑनलाईन NCCRP Portal वर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयीत बँक खात्यात थांबविण्यात आली. तक्रारदार याची बँक खात्यांमध्ये थांबविण्यात आलेली रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदार यांना सुचना देण्यात आल्या. तक्रारदार यांनी त्यांची फसवणुची रक्कम परत मिळविण्याकरीता मा. न्यायालयात याचिका दाखल केलेली, त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी मा. न्यायालयामध्ये सविस्तर अहवाल सादर केला व मा. न्यायालयाचे आदेश प्राप्त केले.

अश्याप्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच मा.न्यायालय यांचेकडे सातत्याने पाठपुरावा करुन **तक्रारदार यांची फसवणुक झालेली रुपये २,६९,४८६/- रक्कम त्यांचे मुळ खात्यात परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **कोणत्याही अनोळखी मोबाईल धारकाची पडताणी केल्याशिवाय कारवाई करु नये.**
- **मोबाईलमध्ये कोणतेही ॲपची पडताळणी केल्याशिवाय डाऊनलोड करु नये.**
- **आपली वैयक्तिक तसेच बँकेसंबंधीत गोपनीय माहिती कोणासही उघड करु नये.**
- **ऑनलाईन प्रलोभने, बक्षिसे, क्रेडिट कार्ड रिडीम पॉईंट जमा करणे यासारख्या गोष्टींची पडताळणी केल्याशिवाय कारवाई करु नये.**
- **अनोळखी लिंकवर क्लिक करू नये.**
- **जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर, गुंतवणुक ॲपवर विश्वास ठेवु नये. तसेच ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.**
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.**
- **ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली साबयर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी पोनि/सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर, मपोअं/सुवर्णा माळी, पोअं/विलास खाटीक, पोअं/राहुल बन, मपोहवा/माधुरी धिंडे यांनी पार पाडली आहे.

**सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०**

**सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in**

------------00000-------------